# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# सोमवार, दिनांक ०१ एप्रिल २०२४

**ठळक बातम्या**

1. **बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **नागपूर जिल्ह्यातील १२ मतदान केंद्रांचं नेतृत्व करणार महिला अधिकारी.**
3. **राज्यात आजपासून  नवीन वीज दर लागू, सुमारे १० टक्के होणार दरवाढ. आणि**
4. **देशात आजपासून सुरू झालेल्या नव्या करपद्धतीमध्ये बदल नाही.**

*****

रिझर्व्ह बँक स्थापना दिन

देशातल्या सर्व क्षेत्रातल्या नागरिकांना, व्यावसायिकांना सोयीनुसार आणि गरजेनुसार बँकिंग करता यावं; तसंच बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चित करण्याची गरज पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. रिझर्व बँकेच्या स्थापना दिनाच्या निमित्तानं मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देताना रोखे विरहित व्यवहारांमधून होणाऱ्या बदलांकडं लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सर्वसमावेशक प्रगतीसाठी विभिन्न क्षेत्रांची भविष्याची गरज ओळखून काम करण्याची आणि अभिनव संकल्पना राबवण्याची शिफारस पंतप्रधानांनी आज रिझर्व्ह बँकेला केली. गेल्या १० वर्षात देशातल्या बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी आजच्या भाषणात घेतला. यावेळी त्यांच्या  हस्ते ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं लोकार्पण झालं. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कोरोना काळात रिझर्व्ह बँकेनं उचललेल्या पावलांचं कौतुक केलं. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला, बँकांना आणि चलनवाढ आटोक्यात आणण्याला फायदा झाल्याचं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्राला बदलत्या काळानुसार सुसंगत करण्यासाठी रिझर्व्ह बँक कार्यरत असल्याचं गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी म्हणाले. राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सीबीआय

केंद्रीय अन्वेषण ब्युरो सीबीआयच्या स्थापना दिनानिमित्त आज नवी दिल्लीत विसावं डी.पी. कोहली स्मृती व्याख्यान आयोजित करण्यात आलं आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं होणाऱ्या या कार्यक्रमात भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी.वाय.चंद्रचूड 'ॲडॉप्टिंग टेक्नॉलॉजी टू ॲडव्हान्स क्रिमिनल जस्टिस' या विषयावर व्याख्यान देतील. या प्रसंगी सीबीआय अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकं आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदकं प्रदान करण्यात येणार आहेत. गेल्या सहा दशकांहून अधिक काळ, सीबीआय ही देशातील प्रमुख तपास करणारी आणि खटला चालवणारी संस्था म्हणून उदयास आली आहे. भारतातील इंटरपोलसाठी राष्ट्रीय केंद्रीय ब्युरो म्हणून CBI कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी समन्वय देखील करते.

महिला मतदान केंद्र

नागपूर जिल्ह्यातील नागपूर आणि रामटेक या दोन लोकसभा मतदार संघासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होत आहे. अधिकाधिक मतदारांनी मतदान करावं, यासाठी विशेष मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. यात जिल्ह्यातील १२ महिला मतदान केंद्रांचा समावेश आहे. ज्या मतदान केंद्रात पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या जास्त असते, अशा ठिकाणी साधारणतः महिला मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. या मतदान केंद्रांचं सर्व संचालन महिला अधिकारी आणि कर्मचा-यांच्या हातात असणार आहे. यामध्ये काटोल विधानसभा मतदार संघातील काटोल हायस्कूल, सावनेर विधानसभा मतदारसंघातील नगर परिषद सुभाष हिंदी प्राथमिक शाळा, सावनेर हिंगणा विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, इसासनी, उमरेड विधानसभा मतदारसंघातील पंचायत समिती कार्यालय, उमरेड सहायक गटविकास अधिकारी यांचा कक्ष, नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातील मिलिंद प्राथमिक शाळा, उंटखाना, नागपूर दक्षिण मधील वंदे मातरम विद्यालय अवधूत नगर या महिला केंद्रांचा समावेश आहे. याशिवाय नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातील के.डी.के. कॉलेज, नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघातील बाबा नानक सिंधी हिंदी हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर पश्चिम

मतदारसंघातील हैदराबाद हाऊस, नागपूर उत्तर मतदारसंघातील विनियालय हायस्कूल, कामठी विधानसभा मतदारसंघातील दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी आणि रामटेक विधानसभा मतदारसंघातील श्रीराम विद्यालय या केंद्रांचाही महिला मतदान केंद्र म्हणून समावेश करण्यात आला आहे.

पेड न्यूज

निवडणूक काळात वृत्त देतांना माध्यमांनी ते वस्तुनिष्ठ, प्रामाणिक आणि तटस्थ भूमिकेतून द्यावं, अशा सूचना प्रेस कौन्सील ऑफ इंडियानं दिल्या आहेत. निवडणूक कालावधीत कोणत्याही प्रसार माध्यमात प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांवर माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती अर्थात एम.सी.एम.सी.च्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. प्रसारित झालेली बातमी ही पेडन्यूज आहे, अशी शंका समितीला आल्यास अथवा तशी समितीकडं कोणी तक्रार केल्यास त्या वृत्तासंबंधी संबंधित उमेदवाराला एम.सी.एम.सी समिती खुलाशाची विचारणा करू शकते.

निवडणूक निरीक्षक विपुल बंसल

नागपूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक विपुल बंसल यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध कक्षांना भेटी देऊन कामकाजाची पाहणी केली. जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी विविध कक्षामार्फत सुरू असलेल्या कामकाजाची माहिती यावेळी त्यांना दिली. आदर्श आचारसंहिता कक्ष, सी-व्हिजिल ॲपवर आलेल्या तक्रारींचा आढावा, कार्यवाही तसंच तक्रार निवारण कक्षाला भेट देत त्यांनी कामकाजाचा आढावा घेतला.

चेक पोस्ट

वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील धनज बुद्रुक चेकपोस्टवर अमरावती इथून वाशीमकडं येत असलेल्या एका वाहनातून ३६ लाख रुपयांची रोकड पकडण्यात आल्यानंतर आता जिल्ह्यातील सर्वच सीमांवर वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. यामध्ये अगदी लग्न समारंभाच्या गाड्यासुद्धा तपासल्या जात आहेत. लोकसभा निवडणूक असल्यानं जिल्हा प्रशासन सतर्क झालं असून बहुतांश ठिकाणी चेक पोस्ट लावण्यात आले आहेत.

केशव उपाध्ये

दिल्लीतील रामलीला मैदानावर काल झालेला इंडिया आघाडीचा मेळावा हा भ्रष्टाचाऱ्यांचा महामेळा होता, अशी टीका भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये

यांनी केली. मुंबई इथल्या भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उपाध्ये म्हणाले की, या महामेळ्यात घोटाळ्याचे अनेक आरोप असलेली नामवंत मंडळी एकत्र आली होती. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनीही या महामेळ्याला उपस्थिती लावली होती. कितीही कांगावा केला, तरी या नेतेमंडळींना लोकसभा निवडणुकीत आपापल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर मतदारांना उत्तरं द्यावी लागणार आहेत, असं उपाध्ये म्हणाले.

बुलढाणा लोकसभा नामांकन

बुलढाणा मतदार संघाची उमेदवारी महायुतीच्या माध्यमातून शिंदे शिवसेनेचे उमेदवार विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांना मिळाली असली, तरी बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विजयराज शिंदे यांनी आज भाजपच्या वतीनं तसेच अपक्ष अर्ज दाखल केला आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी आज ११ उमेदवारांनी २७ नामनिर्देशनपत्राची उचल केली, तर आजवर २ उमेदवारांनी ४ नामनिर्देशनपत्र दाखल केलं आहे.

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम आकाशवाणी आजपासून आपल्यासाठी घेऊन येत आहे. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आजच्या भागात आपण नागपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल. तेव्हा ऐकायला विसरू नका, आजपासून संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात च्या दरम्यान 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'.

नवीन वीज दर

राज्यात आजपासून नवीन वीज दर लागू झाले आहेत. इंधन अधिभार जोडल्यावर सुमारे १० टक्के दरवाढीचा बोजा महावितरणच्या ग्राहकांवर पडणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३ च्या आदेशानुसार ही दरवाढ झाली आहे. दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत वीज दरवाढ होईल. घरगुती संवर्गातील सिंगल फेजसाठी पूर्वी ११६ रुपये लागायचे. आता १२८ रुपये

लागतील. श्री फेजसाठी पूर्वीच्या ३८५ रुपयांऐवजी ४२५ रुपये लागणार आहेत. वाणिज्यिक ग्राहकांना पूर्वीच्या ४७० रुपयांऐवजी ५१७ रुपये द्यावे लागतील.

शेफाली बी.शरण

पत्र सूचना कार्यालयाच्या प्रधान महासंचालक पदावरून मनीष देसाई काल सेवानिवृत्त झाल्यानंतर शेफाली बी.शरण यांनी आज प्रधान महासंचालक म्हणून पदभार स्वीकारला. शरण या भारतीय माहिती सेवेच्या १९९० च्या तुकडीच्या अधिकारी आहेत. तीन दशकांहून अधिक काळाच्या त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी अर्थ, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालय यासारख्या मंत्रालयांसाठी पत्रसूचना कार्यालय अधिकारी म्हणून माध्यम प्रसिद्धीचं कार्य पाहिलेलं आहे. त्यांनी भारतीय निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्या म्हणूनही काम केलं आहे. या व्यतिरिक्त त्यांनी केंद्रीय कर्मचारी योजना प्रतिनियुक्तीवर आरोग्य मंत्रालय आणि अर्थ मंत्रालयात संचालक म्हणून अधिकारी पदावर काम केलं आहे.

रेडी रेकनर

आजपासून सुरू होत असलेल्या नव्या आर्थिक वर्षात रेडी रेकनरच्या दरात कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. सलग दुसऱ्या वर्षी या दरात कोणतीही वाढ झालेली नाही. दरम्यान, नवीन कर धोरणाबाबत समाज माध्यमांवर प्रसारित होणारे संदेश दिशाभूल करणारे असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

नवीन कर प्रणाली

देशातल्या करपद्धतीमध्ये आजपासून सुरू झालेल्या नव्या आर्थिक वर्षात काहीही बदल होत नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या आर्थिक वर्षापासून डिफॉल्ट व्यवस्था नवीन कर रचना लागू झाली असली, तरी करदात्यांना जुनी कर रचना निवड करण्याचा पर्याय खुला असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं. नवीन कर रचनेनुसार ० ते ३ लाखांच्या वार्षिक उत्पन्नावर कर आकारण्यात येणार नाही, ३-६ लाखांच्या वार्षिक उत्पन्नावर ५%, ६ ते ९ लाखांच्या वार्षिक उत्पन्नावर १०%, ९-१२ लाखांपर्यंत १५%, १२- १५ लाखांपर्यंत २०% आणि १५ लाखांपेक्षा अधिक वार्षिक उत्पन्नावर ३०% कर आकारण्यात येणार आहे. दरम्यान, व्यक्तिगत करदात्यांसाठी ही नवीन कर रचना आहे. गेल्या आर्थिक वर्षाचं कर

विवरणपत्र भरेपर्यंत या कर रचनेतून बाहेर पडण्याचा पर्याय उपलब्ध असेल. व्यावसायिक उत्पन्न नसलेल्या सर्व करदात्यांना दरवर्षी कर विवरणपत्र भरताना ही संधी मिळेल. नव्या कर रचनेत करांचे दर कमी असले, तरी विविध सवलती उपलब्ध नाहीत.

****